'GROWTH' BUSINESSES PERFORMED WELL: MD

Tata Consumer net up 28% on lower tea costs

VIVEAT SUSAN PINTO
Mumbai, July 24

TATA CONSUMER PRODUCTS reported a nearly 28% year-on-year increase in consolidated net profit for the first quarter (Q1FY27), as improved operating margins and lower tea costs in India supported earnings.

The company saw consolidated net profit touch ₹427 crore in Q1 versus ₹334 crore reported last year. Revenue for the quarter grew nearly 12% year-on-year to ₹5,349 crore, with both figures coming in line with Street estimates of ₹432 crore and ₹5,398 crore each.

Operating performance also improved during the quarter. Earnings before interest, tax, depreciation and amortisation (Ebitda) increased 19.3% to ₹724 crore, up from ₹607 crore a year ago, nearly in line with *Bloomberg's* consensus estimate of ₹740 crore for the period.

The company's Ebitda margins expanded to 13.5% from 12.7% in the year-ago period, broadly matching analysts' expectations of 13.6% for the period. Tata Consumer said the improvement in operating performance was primarily driven by lower tea costs in India, which helped offset the impact of elevated coffee prices in the US.

The company, however, continued to face inflationary pressure on several key input costs. It also said higher investments behind its brands weighed on costs during the quarter, reflecting its focus on strengthening market presence and supporting long-term growth.

"The India branded business delivered robust underlying volume growth reflecting continued focus on execution, category expansion and innovation. Our 'Growth' businesses performed very well and have scaled their overall contribution to the India business," said Managing Director & CEO Sunil D'Souza.

Despite cost headwinds, sector analysts said the firm delivered double-digit growth in revenue and profitability, with margin expansion highlighting improved operating leverage and favourable commodity costs in its India tea business.

REPORT CARD

Tata Consumer Products consolidated financials



Adani Energy wins ₹8,500-cr Andhra transmission project

FE BUREAU
Mumbai, July 24

ADANI ENERGY SOLUTIONS (AESL), on Friday said it has won an inter-state transmission project worth about ₹8,500 crore in Andhra Pradesh.

The project named transmission system for proposed green hydrogen/green ammonia projects in Vizag Area, Andhra Pradesh (Phase-I)," was awarded through the tariff-based competitive bidding (TBCB) framework of the union government where AESL emerged as the highest bidder.

The transmission system is planned to facilitate integration and supply of power to the proposed green hydrogen and green ammonia projects in the Vizag area, catering to an estimated demand of 4,500 MW., the company said.

The project will also support the growing load requirement expected from the Pendurthi–Vizag region, where many data centre and digital infrastructure investments are coming, it said. The project will be housed under the special purpose vehicle, Vizag Power Transmission. Its scope involves setting up a 4×1500 MVA, 765/400 kV GIS substation at Pendurthi (Vizag) and a 3×1500 MVA, 765/400 kV Khammam-II substation. With this, AESL will add 1,582 ckm of transmission lines and 10,500 MVA of transformation capacity, taking its overall transmission network to 29,531 ckm and 1,33,675 MVA of transformation capacity.

Kandarp Patel, CEO, Adani Energy Solutions said, "The project will support the development of green hydrogen and green ammonia capacity in Andhra, while also strengthening the grid for emerging digital infrastructure demand in the Pendurthi–Vizag region.

The project is contracted to be delivered in 30 months, it said.

Air India to retain A319s for a few more months

AKBAR MERCHANT
Mumbai, July 24

AIR INDIA MAY have withdrawn its Airbus A319 aircraft from active commercial service, but the ageing narrow body jets will remain with the airline for a few more months as the sale process gathers pace.

According to people aware of the development, the Tata Group-owned carrier currently has six A319s, most of which remain in flyable condition despite being removed from scheduled operations a few weeks ago. The aircraft are being retained to support operational requirements until their eventual sale is completed.

The move marks another step in Air India's fleet modernisation programme, under which older-generation aircraft are being phased out in favour of newer Airbus A320 family jets. The A319 will become the second major aircraft type to exit the fleet after the retirement of the Boeing 777-200LR earlier this year.

Air India inducted the A319s from 2006 onwards and, at one stage, operated a fleet of around 20 aircraft. Their numbers have steadily declined over the years as newer, more fuel-efficient narrowbody jets entered service.

FLEET CHECK

- The Tata Group-owned carrier currently has six **A319s**, most of which remain in flyable condition
- Move marks Air India's fleet modernisation programme, under which older-generation aircraft are being phased out
- Configured with eight business-class, 114 economy-class seats, the A319s primarily operated on domestic routes in recent years

Configured with eight business-class and 114 economy-class seats, the A319s primarily operated on domestic routes in recent years, while also serving select short-haul international destinations such as Dubai and Singapore. Air India's narrow-body fleet has since transitioned to a three-class cabin configuration as part of its fleet and product overhaul.

The airline has appointed UK-based aircraft marketing specialist Skytech AIC to sell the six aircraft. According to Skytech AIC's website, the A319s are being marketed without their CFM56-5 engines and are available for immediate sale. The company said the mandate follows the successful sale of Air India's Boeing 747-400 fleet in 2025.

"We are delighted to have again been selected by India's flag-carrier, Air India, for this important assignment, which follows the successful conclusion of the sale of the airline's 747-400 fleet," Skytech AIC MD Julian Balaam said in a statement on the company's website.

When asked to give additional details, the company said: "Skytech-AIC is bound by a confidentiality agreement and therefore we are unable to discuss anything about the A319 project with Air India."

Hind Zinc Q1 profit more than doubles

VEDANTA GROUP FIRM Hindustan Zinc (HZL) on Friday reported over two-fold jump in consolidated net profit to ₹5,469 crore for the quarter ended June 30 on the back of higher metal prices, and increased metal production. The firm had posted a net profit of ₹2,234 crore in the corresponding quarter of the previous fiscal.

"During the quarter, net profit stood at ₹5,469 crore, up 145% y-o-y," HZL said.

The revenue of HZL rose by 71.6% to ₹13,033 crore during Q1 over ₹7,591 crore in the year-ago period.

The revenue from operations rose "driven by higher metal prices, increased metal production, lead concentrate sale, higher by-product realisation, and a stronger dollar," HZL said.

Revenue from operations rose, driven by higher metal prices and by-product realisation, and a stronger dollar

The board also appointed former SAIL Chairman and MD Amarendu Prakash as the CEO and Whole-time Director of Hindustan Zinc with effect from August 1, 2026.

The firm further said that Amit Gupta has assumed the role of Chief Financial Officer of Hindustan Zinc with effect from June 1.

"Our debottlenecking initiatives continue to enhance refined metal production and reinforce our position as one of the world's lowest-cost zinc producers. As demand for zinc continues to be driven by infrastructure and the energy transition, we remain committed to delivering responsible growth and long-term value for our stakeholders," the firm's CEO Arun Misra said. —PTI

Jindal Steel Q1 profit falls 44% to ₹844 crore

JINDAL STEEL ON Friday posted a 43.53% fall in consolidated net profit to ₹843.80 crore in the June quarter, citing higher expenses. It had reported a net profit of ₹1,495.97 crore in the year-ago quarter, the firm said in an exchange filing.

Jindal Steel, however, increased its income to ₹15,501.32 crore from ₹12,324.88 crore in Q1FY26.

Expenses also increased to ₹14,296.36 crore from ₹10,306.97 crore recorded in the April-June period of the preceding 2025-26 fiscal year.

VR Sharma reappointed as MD

The steel firm on Friday announced the appointment of Vidya Rattan Sharma as the firm's Managing Director for the second time.

He previously served as the MD of Jindal Steel (erstwhile Jindal Steel & Power) from 2019 to 2022. —PTI

OTHER RESULTS

ACC Q1 profit down 60.8%

ACC, AN ADANI Group cement firm, on Friday reported a decline of 60.8% in consolidated net profit to ₹147 crore for the June quarter of FY27, on a year-on-year (y-o-y) basis, as sales volume declined. The firm had posted a profit of ₹375 crore in the April-June quarter a year ago, according to a filing from ACC. —PTI

Orient Q1 profit declines 62.4%

ORIENT CEMENT HAS reported a 62.4% decline in its net profit to ₹77 crore for the June quarter of FY27, on a year-on-year basis. The firm had reported a net profit of ₹205 crore for the April-June period a year ago, the subsidiary of Adani Group-owned Ambuja Cements said in a filing on Thursday. —PTI

Dalmia Bharat Q1 profit falls 51%

CEMENT MAKER DALMIA Bharat on Friday reported a 51.4% year-on-year decline in its consolidated net profit at ₹192 crore in the June quarter of FY27, mainly on account of exceptional items. The company had posted a net profit of ₹395 crore in the April-June quarter a year ago, Dalmia Bharat said in a regulatory filing. —PTI

CG Power net rises 16% in Q1

CG POWER AND Industrial Solutions posted a 16% growth in profit after tax attributable to owners at ₹313 crore in the first quarter of current financial year as compared to ₹269 crore in the corres-ponding quarter of previous financial year. The revenue from operations went up 14% at ₹3,280 crore in Q1FY27. —FE BUREAU

पीएमपी कुणाच्या घरची संस्था नाही

प्रशासनाला महापौर नागपुरे यांचे खडे बोल

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएमएल) ही सार्वजनिक संस्था आहे. ही प्रवाशांच्या हितासाठी असली पाहिजे. ही कोणाच्या घरची खासगी संस्था नाही,' अशा शब्दांत महापौर मंजूषा नागपुरे यांनी 'पीएमपीएमएल'च्या प्रशासनाला सुनावले. 'लोकप्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांना हस्तक्षेप समजण्याची मानसिकता अधिकाऱ्यांनी बदलावी,' असेही महापौरांनी सुनावले.

'पीएमपी'वर शुक्रवारी विशेष सर्वसाधारण सभा महापालिकेत झाली. ही सभा सुमारे साडेदहा तास चालली. सकाळी ११ वाजता सुरू झालेली सभा रात्री साडेनऊ वाजता संपली. या सभेत सदस्यांनी 'पीएमपी'च्या तक्रारींचा पाढा वाचला. नगरसेवकांनी 'पीएमपी'च्या कारभारावर ताशेरे ओढून कारभार सुधारण्याची अपेक्षा व्यक्त केली. महापौर नागपुरे यांनीही 'पीएमपी'च्या कारभारावर नाराजी व्यक्त केली आणि मनमानी कारभार बंद करण्यास सांगितले. महापौर म्हणाल्या, 'नगरसेवकांनी स्वतः बस डेपोची पाहणी केली, बसमधून प्रवास केला आणि कर्मचारी, प्रवाशांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेतल्या. त्यामुळे नगरसेवकांच्या सूचना आणि तक्रारी योग्य असून, त्यांना गांभीर्याने घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.'

सभागृह नेते गणेश बिडकर यांनी ही प्रशासनावर जोरदार हल्ला चढविला. 'पुणे महापालिका ही 'पीएमपीएमएल'ची ६० टक्के भागधारक आहे. त्यामुळे हे सभागृहच सर्वोच्च असून, लोकप्रतिनिधींना डावलून कारभार चालणार नाही,' असे बिडकर म्हणाले. नवीन बस खरेदीपूर्वी डेपो, पार्किंग, चार्जिंग स्टेशन, चालक-वाहक भरती आणि सविस्तर डीपीआर तयार करण्याची मागणी केली. कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन, पेन्शन, आरोग्य सुविधा, २० ते २५ निविदांतील कथित अनियमितेची चौकशी आणि मेट्रो स्थानकांना जोडणारी फीडर बस सेवा सुरू करण्याचीही मागणी केली.

'सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जनसेवेसाठी'

सर्वसाधारण सभेत सदस्यांनी उपस्थित केलेल्या आरोपांना अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, 'सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही नफा कमावण्यासाठी नव्हे, तर जनसेवेसाठी चालवली जाते. देशातील इतर शहरांतील स्थानिक वाहतूक व्यवस्थेच्या तुलनेत पुण्याची बसव्यवस्था अधिक चांगली आहे. गेल्या चार वर्षांत महामंडळाच्या उत्पन्नात १२० टक्क्यांनी वाढ झाली असून, खर्चावरही नियंत्रण ठेवण्यात यश आले आहे. जागतिक मानकांनुसार दर एक लाख लोकसंख्येमागे ६० बसची आवश्यकता असते. पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये मिळून सुमारे १ कोटी ३० लाख लोकसंख्येसाठी सुमारे ६ हजार बसांची गरज आहे. मात्र, सध्या 'पीएमपी'कडे केवळ १,९६४ बसचा ताफा आहे. त्यामध्ये १,३०६ कंत्राटी (सीएनजी व इलेक्ट्रिक) आणि ६५८ स्वतःच्या बसांचा समावेश आहे. केंद्र सरकारकडून लवकरच एक हजार नवीन इलेक्ट्रिक बस मिळणार असून, या वर्षी आणखी एक हजार सीएनजी बस खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे.'

'पीएमपीमध्ये ब्रेकडाऊन ची संख्या वाढली आहे, ही वस्तुस्थिती आहे. प्रवासीसंख्या देखील कमी झाली आहे. मेट्रो सुरू झाल्याने ही संख्या त्याकडे वळली आहे. कर्मचाऱ्यांसाठीदेखील आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून देण्याची प्रशासनाची तयारी आहे,' असे ते म्हणाले.

पीएमपी कायम तोट्यात कशी?

बसस्थानके, आर्थिक तूट, भूखंड आणि पेन्शनच्या प्रश्नांवर प्रशासन धारेवर

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पुणे शहरातील बसस्थानकांची झालेली दुरवस्था, ब्रेकडाऊन होणाऱ्या बसची वाढत असलेली संख्या, बसमध्ये आणि बस स्थानकांवर बेकायदा पद्धतीने लावल्या जाणाऱ्या जाहिराती, कर्मचाऱ्यांचे वर्षानुवर्षे न सुटणारे प्रश्न अशा विविध प्रश्नांवरून नगरसेवकांनी 'पीएमपी'चे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांना शुक्रवारी धारेवर धरले.

'पीएमपीएमएल'च्या प्रश्नांवर शुक्रवारी पुणे महानगरपालिकेच्या हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात चर्चा झाली. या सभेत वाढती आर्थिक तूट, भाडेतत्त्वावरील भूखंडांची माहिती, निवृत्त कर्मचाऱ्यांच्या रखडलेल्या पेन्शन प्रस्तावांवर नगरसेवकांनी भूमिका मांडली.

''पीएमपी' प्रत्येक वर्षी तोट्यात कशी जाते, ही तूट भरून काढण्यासाठी दर वेळी महापालिकेलाच आर्थिक मदत का करावी लागते,' अशी विचारणा नगरसेविका अनिता इंगळे यांनी केली. प्रभागामध्ये बस स्टॉपची उभारणी करावी, नांदेड सिटीसाठी बससेवा सुरू करण्याची मागणी इंगळे यांनी केली. कोंढवा-कौसरबाग येथील बसस्थानकाची दयनीय अवस्था झाल्याची तक्रार गफूर पठाण यांनी केली. वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप त्यांनी केला आणि नागरिकांच्या सोयीसाठी तातडीने आवश्यक कामे हाती घेण्याची मागणी केली.

नगरसेवक अपूर्व खाडे म्हणाले, 'डेक्कन जिमखाना येथील भाऊसाहेब शिरोळे बसस्थानकाची आणि तेथील व्यावसायिक गाळ्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. ही बाब अनेकदा पीएमपी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जाते. येथील अनेक गाळे बंद पडल्याने उत्पन्नावर परिणाम झाला असून, प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करून या ठिकाणाचे पुनरुज्जीवन करावे.'

'पीएमपी'च्या भाडेतत्त्वावरील भूखंडांबाबत प्रशासनाकडून पारदर्शक माहिती दिली जात नाही, असा आरोप अश्विनी लांडगे यांनी केला. पीएमपी प्रशासनाने अनेक प्रस्ताव प्रलंबित ठेवले आहेत. त्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन प्रस्ताव रखडले आहेत. हे सर्व प्रस्ताव तातडीने मंजूर करून निवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

सचिन मोरे, रूपाली धाडवे यांनी सभागृहात 'पीएमपी'च्या कारभारावर उपरोधिक कविता केल्या. 'महिलांना सुरक्षितता मिळत नाही. महिलांना आवश्यक स्वच्छतागृहे नाहीत,' अशा व्यथा त्यांनी सभागृहात मांडल्या. स्वरदा बापट म्हणाल्या, 'उपनगरांमधून येणाऱ्या बसच्या फेऱ्या कमी झाल्या आहेत. बस बंद पडतात, ठेकेदारांकडे सर्वांत जास्त बस चालविण्यासाठी दिल्या आहेत. नागरिकांच्या कष्टाचा पैसा आपण देतो. त्या बदल्यात प्रवाशांना सेवा मिळाली पाहिजे.'

हर्षवर्धन मानकर म्हणाले, 'पीएमपीएमएलमध्ये झालेल्या घोटाळ्याचा चौकशी अहवाल तत्कालीन अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी तयार केला होता. तो सभागृहात मांडावा.' दादा कोद्रे म्हणाले, 'वाहतूक कोंडी वाढत आहे. पर्याय म्हणून बसने जास्तीच जास्त नागरिकांनी प्रवास केला पाहिजे. नगरसेवक, अधिकाऱ्यांनीदेखील महिन्यातून किमान एकदा बसने प्रवास केला पाहिजे.'

संचालकांकडून उत्पन्नवाढीचे उपाय

'पीएमपी'च्या संचालक मंडळावर अजय खेडेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्वसाधारण सभेत त्यांनीदेखील तक्रारींचा पाढा वाचला. 'काम करताना डोळ्यांसमोर उद्दिष्ट ठेवून काम केले पाहिजे. पर्यटनाच्या माध्यमातून बस सुरू केल्यामुळे उपन्नात वाढ झाली. करार संपलेल्या मिळकतींचे करार नव्याने केले. तूट का वाढली, याचा अभ्यास केला पाहिजे. पीएमपी मालकीच्या रिकाम्या जागा ताब्यात घ्यायच्या आहेत,' असे ते म्हणाले.

पाणीसाठा ८०.३५ टक्क्यांवर

पुणे : शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात संततधार कायम राहिल्यामुळे धरणांतील उपयुक्त पाणीसाठ्याने गेल्या वर्षीची सरासरी गाठली आहे. चारही धरणांमध्ये मिळून २३.४२ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा उपयुक्त साठा असून, धरणे ८०.३५ टक्के भरली आहेत. गेल्या वर्षी याच दिवशी पाणीसाठा २३.६० टीएमसी एवढा होता. पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाल्यामुळे पुणेकरांच्या पाण्याची चिंता पुढील वर्षभरासाठी मिटणार आहे.

भीमा खोऱ्यातील पाच धरणे काठोकाठ

जिल्ह्यातील कळमोडी, चासकमान, वडिवळे, वीर, खडकवासला ही धरणे काठोकाठ भरली आहे. घोड, विसापूर, भामा-आसखेड, आंध्रा, पवना, कासारसाई ही धरणे भरण्याच्या मार्गावर आहेत. ही सर्व धरणे ९० टक्क्यांपेक्षा जास्त भरली असल्याची माहिती देण्यात आली. कासारसाई, चासकमान, वीर, वडीवळे, पवना, मुळशी या धरणातून विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

पोलीस चौकीपासून हाकेच्या अंतरावर गोळीबार

शहरात दोन घटना, पाच जणांना अटक

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : शहरात शुक्रवारी दोन ठिकाणी गोळीबाराच्या घटना घडल्या. खडक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घोरपडे पेठ पोलीस चौकीसमोर सकाळी दोघांवर पिस्तुलातून गोळीबार करण्यात आला, तर सायंकाळी महापालिका वसाहतीत गोळीबाराची घटना घडली. घोरपडे पेठ पोलीस चौकीसमोरील घटनेत एक तरुण गंभीर जखमी झाला. त्याच्याबरोबर असलेला एक जण पळाल्याने बचावला. या प्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ख्वाजाउद्दीन नजीर शेख उर्फ नूर शेख (वय २९) असे गंभीर जखमीचे नाव आहे. त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी सुजल सुनील परदेशी (वय २२), सोनू उर्फ माँटू अनिल परदेशी (वय २७), जय अनिल परदेशी (वय २५), नीतेश रिकब (वय २२, सर्व रा. काशेवाडी, भवानी पेठ), विकी राजू परदेशी (वय ३५) यांना रात्री उशिरा अटक करण्यात आली. आरोपींबरोबर असलेल्या दोन साथीदारांचा शोध घेण्यात येत आहे. प्राथमिक चौकशीत वैमनस्यातून शेख याच्यावर पिस्तुलातून गोळ्या झाडण्यात आल्याची माहिती खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख याच्या काकाने आरोपी सोनू उर्फ माँटू परदेशी याचे वडील अनिल परदेशी यांचा २००५ मध्ये खून केला होता. शुक्रवारी सकाळी साडेअकराच्या सुमारास शेख आणि त्याचा मित्र घोरपडे पेठेतील मोमीनपुरा परिसरात आला होता. त्या वेळी दुचाकीवरून आरोपी तेथे आले. आरोपी सोनू परदेशी याने शेख याच्यावर एकापाठोपाठ तीन गोळ्या झाडल्या. त्या पैकी गोळी नूर याच्या पाठीत शिरल्याने तो गंभीर जखमी झाला. गजबजलेल्या घोरपडे पेठ परिसरात गोळीबार झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात घबराट उडाली.

या घटनेची माहिती मिळताच खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण आणि पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

पीएमसी कॉलनीत गोळीबार

गोळीबाराची पहिली घटना जिथे झाली, तेथून थोड्याच अंतरावर असलेल्या पीएमसी कॉलनी क्रमांक नऊच्या परिसरात शुक्रवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास गोळीबाराची घटना घडली. गोळीबार करणारे आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती मिळाली आहे. ज्याच्यावर गोळीबार करण्यात आला. तो अल्पवयीन असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. या घटनेची माहिती मिळताच परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त कृषीकेश रावले, सहायक आयुक्त सचिन हिरे, खडक पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

महिलेचा छळ केल्याप्रकरणी गुन्हा

पुणे : महिलेचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिला काठीने मारहाण केल्याप्रकरणी लोणी काळभोर पोलिसांनी पती, सासू, सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या बाबत एका महिलेने लक्ष्मीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पती मूळचा अहिल्यानगर जिल्ह्यातील कोल्हार गावचा रहिवासी आहे. तो पिरंगुट परिसरात नोकरी करत आहे. विवाहानंतर महिला, पती हे पिरंगुट परिसरात राहत होते. विवाहानंतर शारीरिक आणि मानसिक छळ करून काठीने मारहाण करण्यात आली, असा आरोप महिलेने फिर्यादीत केला आहे. पोलीस उपनिरीक्षक सपना दांगट तपास करत आहेत.